# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/११/२०१६

**१) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक २३/११/२०१६ रोजी २३.१५ वा. दर. यातील फिर्यादी ही घरात दरवाजा टेकुन दिवानवर झोपले असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे घरात अनाधिकृत प्रवेश करुन तिचे तळपायापासुन गुडग्या पर्यत स्पर्श करुन विनयभंग केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४४८,३५४(अ)(१) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) शेतातील मोटार पंपची चोरी. :-**

दिनांक २३/११/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी अनुप लक्ष्मण देव्हारे वय ४८ वर्ष, रा. रनेरा यांचे शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी इलेक्ट्रीक मोटार पंप कि. ८,१००/-रु. ची शेताजवळील नाल्यावर वरुणा कंपनीची २.५ एचपी ची लावली असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत जबर मार लागल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिंनाक.२०/११/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील मृतक भिमराज यशवंत ठाकुर वय ४२ वर्ष, रा. लावणी पोस्टे पारशिवनी हा रात्री २०.०० वा. दर. आपल्या मोटार सायकलने कटोरी येथे सिहोरा येथे जात असतांना सुकडी फाटया जवळ एका अज्ञात मोटार सायकल चालकाने धडक दिल्याने मृतकचे डोक्याला जबर मार लागल्याने त्यास औषधोपचार करीता सिहोरा ग्रामीण रुग्णालय येथे प्राथमीक उपचार करुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर करुन भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथुन मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खोब्रागडे पो. स्टे. सिहोरा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) गळफास लावल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिंनाक. २०/०११/२०१६ रोजी १५.०० ते १५.३० वा. दर. यातील मृतक कृष्णा तुकाराम निमजे वय ३० वर्ष, रा. मोहाडी याने दि. २०/११/२०१६ ला आपल्या राहते घरी गळफास लावले होते त्यास उपचारा करीता ग्रीन सिटी दवाखाना नागपुर येथे केले असता उपचारा दरम्यान दि. २२/११/२०१६ ला मरण पावल्याने पोस्टे सक्करदरा नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र पोना. १७९९ पोस्टे सक्करदरा यांनी पोस्टेला आणुन पेश केल्याने कागदपत्रावरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-**

दिनांक २४/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ३५ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०२ केसेस अवैध प्रवासी ०१ व ईतर वाहनांवरती ३२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

25/11/2016

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९५५२५६५८५२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.